**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004**
Phone : EPABX –2609000 PG Admission – 2609488 & 2609142
Fax : +91-231-2691533 & 2692333 Website : www.unishivaji.ac.in
email: pgadmission@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४
फोन :इपीबीएक्स२६०९००० पदव्युत्तर प्रवेश विभाग २६०९१४२, २६०९४८८
Estd 1962
NAAC 'A' Grade

संदर्भ क्र. शिवाजी वि./पदव्युत्तर प्रवेश /शिवाजी वि.गुण.शिष्य./आरजीडी/१०० दि. 5 MAR 2020

## परिपत्रक

प्रति,

१. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व परिसंस्था,

२. अधिविभाग प्रमुख/समन्वयक/संचालक,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय :– सन २०१९–२०२० या शैक्षणिक वर्षातील" शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती"बाबत....**

**संदर्भ :– १.या कार्यालयाचे संदर्भ क्र.पी.जी.प्रवेश/शिवाजी वि.गुण.शिष्य./आरजीडी/४४ दि.१४/११/२०१९ रोजीचे पत्र..**

**२. या कार्यालयाचे संदर्भ क्र.पी.जी.प्रवेश/शिवाजी वि.गुण.शिष्य./आरजीडी/५३ दि.१७/१२/२०१९ रोजीचे पत्र..**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय संदर्भाकिंत पत्रानुसार आपणास कळविण्यात येते की, सन २०१९–२०२० या शैक्षणिक वर्षातील "शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती" करीता संभाव्य पात्र ठरलेल्या विद्यार्थी/विद्यार्थीनीकडून ऑनलाईन अर्ज भरून घेण्यात आलेले होते. सदर शिष्यवृत्तीकरीता पात्र ठरलेल्या विद्यार्थी/विद्यार्थीनीची यादी ठेवण्यात आलेली आहे. आपल्या महाविद्यालय/अधिविभागाकडुन सदरची यादी संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणण्यात यावी. सदर यादीमध्ये ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनीच्या नावापुढे No Application असा शेरा आहे अशा संबंधित विद्यार्थी/विद्यार्थीनीकडून विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in/ या संकेतस्थळावरील "Shivaji University Merit Scholarship 2019-2020" या लिंकवरून ऑनलाईन अर्ज भरून घेण्यात यावेत. तसेच सदर अर्जाची हार्ड कॉपीवर प्राचार्य/अधिविभागप्रमुख यांच्या शिफारशीसह व आवश्यक त्या कागदपत्रांसह सदरचे अर्ज हे दि.१३/०३/२०२० रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यत विद्यापीठ कार्यालयामध्ये जमा करण्यात यावेत. या मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ठेवण्यात आलेल्या यादीमधील विद्यार्थ्यांच्या नावापुढे Submit Original Marklist True Copy अशी त्रुटी दर्शविण्यात आलेली आहे. अशा संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास सदरची बाब आणण्यात यावी व त्याची पूर्तता दि.१३/०३/२०२० रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यत करण्यात यावी. या मुदतीनंतर आलेल्या त्रुटींचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

तेव्हा वरील सर्व बाबी विचारात घेवून खालील प्रमाणे सदर शिष्यवृत्तीच्या अनुषंगाने विद्यापीठाकडून तपशीलवार कार्यवाही खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | तारीख |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्याकडून ऑनलाईन अर्ज मागविणे | दि.०४/०३/२०२० ते दि.११/०३/२०२० |
| २. | महाविद्यालय/अधिविभागात विद्यार्थ्याकडून प्राप्त झालेले अर्ज विद्यापीठास सादर करणे | दि.१३/०३/२०२० रोजी दु.३.०० वाजेपर्यत. |
| ३. | विद्यार्थ्याकडून प्राप्त अर्जाची छाननी करून शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्याची यादी अंतिम करण्यासाठी छाननी समितीची बैठक आयोजित करणे. | दि.१७/०३/२०२० |
| ४. | निवड समितीची बैठक आयोजित करणे. | मा.कुलगुरूसो यांचे अध्यक्षतेखाली अंतिम निवड समितीची बैठकीची सोईची तारीख घेवून बैठक आयोजित करणे. |

Scanned with CamScanner

वरील प्रमाणे सदर शिष्यवृत्तीचे वेळापत्रक असून, आपल्या महाविद्यालय/अधिविभागातील पात्र विद्यार्थी/विद्यार्थीनी वरील प्रमाणे नमूद केलेल्या शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेवून या कामी विद्यापीठास पूर्वीप्रमाणे वेळेत सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. व्ही. डी. नांदवडेकर)
कुलसचिव

सोबत :— वरील प्रमाणे.

Scanned with CamScanner